# Gender Sensitization Action Plan

## Internal Complaint Committee Objectives & Report

| Sr. No. | Year wise of Internal Complaint Committee report | Objectives | Pdf link of the ICC |
|---|---|---|---|
| 1. | 2016-17 | | |
| 2. | 2017-18 | | |
| 3. | 2018-19 | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **4.** | **2019-20** | PDF | PDF |
| **5.** | **2020-21** | PDF | PDF |

# Programs on Gender Sensitization

| Sr. No. | Name of the Programme | Respective Programme PDF Link |
|---|---|---|
| 1. | Yuvati Sabha 2016-17 | PDF |
| 2. | Yuvati Sabha 2017-18 | PDF |
| 3. | Yuvati Sabha 2018-19 | PDF |
| 4. | Yuvati Sabha 2019-20 | PDF |
| 5. | Yuvati Sabha 2020-21 | PDF |
| 6. | Swanyansiddha 2018-19 | PDF |

| | | |
|---|---|---|
| 7. | Swanyansiddha 2019-20 | |
| 8. | International Women's Day 2017-18 | |
| 9. | International Women's Day 2018-19 | |
| 10. | Respect for Woman's Power on occasion of International Woman Day 2020-21 | |
| 11. | Online Lecture on Women Safety and Laws 2020-21 | |
| 12. | Workshop on Implementation of the Prevention of Sexual Harassment of Women in the Workplace Act 2013 | |
| 13. | online State Level Essay Competition on Footprints of Women Power 2020-21 | |

| | | |
|---|---|---|
| 14. | Rakshabandhan Celebration 2017-18 | |
| 15. | Traditional Saree Day 2018-19 | |
| 16. | Traditional Saree Day 2019-20 | |
| 17. | Mehndi and Rangoli Competition 2018-19 | |
| 18. | Kavayitri Bahinabai Chaudhari Yanchya Jivancharitravar Adharit online Rangoli Spardha 2020-21 | |

# Photo Section




One day Workshop on Sexual harassment of women at workplace




Workshop on Cyber Crime



Celebration of Raksha Bandhan (Rakhi)



Celebration of Birth Anniversary of Dr. S. Radhakrishnan



Lecture on the occasion of Mental Peace awareness Campaign



Save Girl Child Programme




**Traditional Dress Day Celebration**



**1 week Judo Karate Training Under the Swayamsiddha Abhiyan.**



Celebration of International Women’s Day




On the occasion of Traditional saree day, College Organizes Traditional Dish Competition.



Dance Competition on the occasion of Traditional Dress Day Celebration




Felicitation of Girl Child Mothers



## Celebration Saree Day




**1 week Judo Karate Training Under the Swayamsiddha Abhiyan**



**Inauguration of Yuvati Sabha**



**Programme on the occasion of Yuvati Sabha Inauguration**



**Programme on Girl Child**




**Dr. Vandana Patil Dahivel College delivering speech on Beti Bachav Beti Padhav**

# News Section

पुण्य नगरी

रविवार १० मार्च २०१९

## स्त्री-पुरुष समानतेचा लढा संघटीतपणे लढायला हवा : डॉ.बच्छाव



साक्री । प्रत्येक कुटुंबाचा आधार महिला असते. महिलाच घराला घरपण देते तरीही ती निराधार आहे. म्हणून स्त्री, पुरुष समानतेचा लढा संघटीतपणे लढणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. विजय बच्छाव यांनी केले.

येथील सी. गो. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील युवती सभेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त 'स्त्री समानता : काल आणि आज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनंत पाटील होते. युवती सभेच्या प्रमुख प्रा.अनूपमा देवरे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक उषा शेलार उपस्थित होत्या. डॉ.बच्छाव म्हणाले, मध्ययुगीन काळात स्त्रीला भोगवादी समाजाने दास्यत्वाची वागणूक दिली. तिला उपभोगवस्तूचा दर्जा दिल्याची खंत व्यक्त केली. एकविसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीने तिचे बळ ओळखून समानतेसाठी काही दरवाजे मुक्त केले आहेत. तरीही हक्कांपासून वंचित असलेली स्त्री भयभीत आणि पीडित आहे, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणातून उपप्राचार्य डॉ. आनंद पाटील यांनी महिलांच्या सन्मानासाठी हिंदी साहित्याच्या योगदानाचा आढावा घेतला. यावेळी प्रा.विश्वास भामरे, प्रा.सचिन गोवर्धने, प्रा. अशोक सोनवणे उपस्थित होते. संयोजक प्रा. डॉ. लहू पवार, प्रा. पंकज अहिरे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. एस. साळुंके यांनी केले. प्रा. एस. सी. सोनवणे यांनी आभार मानले.

लोकमत धुळे, शुक्रवार, दि.१५ जानेवारी २०१६

## संक्रांतीनिमित्त 'साडी डे' व 'फेटा डे'

### पाटील महाविद्यालय : संस्कृती जोपासण्याचा विद्यार्थ्यांचा उपक्रम



फेटे बांधून काव्यवाचन करताना विद्यार्थी.

साक्री : येथील सी.गो. पाटील महाविद्यालयात मकरसंक्रांतीनिमित्त विद्यार्थिनींनी 'साडी डे' तर विद्यार्थ्यांनी 'फेटा डे' साजरा करून भारतीय संस्कृतीची जोपासना व्हावी यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले.

या उपक्रमाबरोबरच मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्ताने काव्यवाचन व ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रम उत्साहात घेण्यात आले. यासाठी महाविद्यालयीन तरुण व तरुणींनी काव्यवाचन, पोवाडे, भजन इत्यादींचे सादरीकरण केले. काव्य वाचनासाठी २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात शेतकरी जीवनावर, तरुणाई, बेटी बचाव, आई वडील, संस्कार इत्यादी विषयांवर मुलामुलींनी आपापल्या कवितांचे सादरीकरण केले. यात योगेश बावा, सचिन भामरे, उन्नती देसले, संजीवनी अहिरराव, सुमित्ता तोरवणे, माधुरी देसले यांच्यासह अनेक स्पर्धकांनी काव्यवाचन, भजनाचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रवींद्र देवरे, डॉ.प्रकाश साळुंके, प्रा.एस.सी. सोनवणे, प्रा.ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा.पुष्पा सोनवणे, प्रा.विजय बच्छाव, प्रा.भामरे, प्रा.पालखे, प्रा.डी.एस. पाटील, प्रा.अनंत पाटील व विद्यार्थिनी प्रतिनिधी माधुरी देसले उपस्थित होते. यासाठी सर्व वर्गप्रतिनिधी, प्राध्यापक व शिक्षकेतरांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी
रविवार, ९ सप्टेंबर २०१८

# केरळ पूरग्रस्तांसाठी मदत

साक्री : येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व युवती सभेच्यावतीने रक्षाबंधनानिमित्त प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांना राखी बांधून युवतींना मिळालेल्या ओवाळणीचे ३ हजार ३२४ रुपये केरळ पूरग्रस्त सहायता निधीसाठी देण्यात आले.



युवती सभेच्या मयुरी सोनवणे, भाग्यश्री सोनवणे, हर्षदा शिवदे, नेहा कार्ले, गीतांजली अहिरराव, भाग्यश्री बच्छाव या विद्यार्थिनींनी युवती सभेच्या प्रमुख प्रा. अनुपमा देवरे, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी अनंत पाटील व विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सुनील पालखे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी याप्रसंगी रक्षाबंधनाचे महत्व विशद केले. याप्रसंगी प्रा. एल. जी. सोनवणे यांचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय छात्रसेना प्रमुख प्रा. पी. एन. शिंदे, डॉ. निंबा आहेर, डॉ. विजय बच्छाव, प्रा. हसन तडवी यांनी विशेष परिश्रम घेतले.

स्वतंत्र भारत
शुक्रवार, दि.२० डिसेंबर २०१९

# स्वरक्षणासाठी जुडो कराटेचे प्रशिक्षण आवश्यक : अहिरे

साक्री। प्रतिनिधी

आरोग्य हेच धन या म्हणीप्रमाणे सर्व जागरूक विद्यार्थिनींनी स्वसंरक्षणासाठी आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी जुडो कराटे चे आठदिवसीय प्रशिक्षण पूर्ण करणे ही समाजात चांगला संदेश पोहोचविणारी गोष्ट असल्याचे प्रतिपादन निवृत्त मुख्याध्यापक बी.जी. अहिरे यांनी केले.

साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत आठ दिवसीय स्वयंसिद्धा अभियान कार्यशाळेचा समारोप झाला. या प्रसंगी समारोपकर्ते म्हणून वासखेडी येथील माध्यमिक विद्यालयाचे निवृत्त मुख्याध्यापक बी.जी. अहिरे, अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, कार्यशाळेचे



समन्वयक डॉ. लहू पवार, प्रशिक्षक मनोज रोडे, शरद पवार, युवती सभेच्या प्रमुख डॉ. ज्योती वाकोडे आदी उपस्थित होते.

अहिरे पुढे म्हणाले की नियमित व्यायाम केल्याने शरीर व मन तंदुरुस्त राहण्यास मदत होते. म्हणून युवतींनी अशा कार्यशाळांमधील सहभागी होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी स्वयंसिद्धा अभियान कार्यशाळेतून जुडो-कराटे सारख्या व्यक्तिमत्व विकासाने आपला वेग-वेगळा ठसा समाजात उमटविण्याचा प्रयत्न करत राहा. यामुळे इतरांनाही आपल्या गोष्टीचा हेवा वाटेल असे आपल्या मनोगतात नमूद केले.

प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कल्याणी हिरे, कीर्ती झाळीज, दिपाली गावित आदींनी आठ दिवसीय प्रशिक्षणाचे अनुभव सांगितले. सूत्रसंचालन डॉ. ज्योती वाकोडे व आभार कार्यशाळेचे समन्वयक डॉ. लहू पवार यांनी मानले.

पुण्य नगरी
गुरुवार, ३० ऑगस्ट २०१८ | धुळे

# गोजरताई भामरे स्मृतीदिन विविध उपक्रमांनी साजरा





साक्री : तालुक्यातील ग्रामीण आदिवासी भागात मुलींच्या शिक्षणासाठी जनजागृती करून शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढवण्याबरोबरच विद्याविकास मंडळाच्या माध्यमातून शिक्षणाचे ज्ञान गंगा वंचितांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करत माजी आ. गोजरताई भामरे यांनी आयुष्य लोकांत अनमोल कार्य केले आहे. आजच्या युवा पिढीने त्यांचा आदर्श समोर ठेऊन भविष्य उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन कवयित्री (?) ... चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य प्रा. संजय सोनवणे यांनी सी. गो. पाटील महाविद्यालयात गोजरताई भामरे यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव सुरेश रामराव पाटील, संस्थेच्या अध्यक्षा मंगलताई पाटील, महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य अनंत पाटील, डॉ. राजेश ठाकूर, प. स. सदस्य युवराज साळुंखे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सतीश देवरे, प्रा. संजय सोनवणे, अनिल भामरे, पंकज पाटील, प्रभाकर बच्छाव आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश पाटील म्हणाले की, माजी आ. गोजरताई भामरे यांनी व स्वातंत्र्य सेनानी रामराव पाटील यांच्यासोबत तालुक्यातील गोरगरीब कष्टकरी जनतेच्या मुला - मुलींना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी मोलाचे योगदान देऊन तालुक्यातील लाटीपाडा धरणाच्या कालव्याद्वारे काटवान भागातील अनेक गावांना पाणीपुरवठा होण्याचे काम केले आहे. तालुकावासियांसाठी केलेले लोकहिताचे विधायक कार्य आजही प्रेरणा देत आहेत. सकाळी ९ वाजता महाविद्यालयाच्या आवारातील गोजरताई भामरे यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच सभागृहात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी रक्तदान शिबिराचे उद्घाटन करून त्यात एकूण ६१ दात्यांनी रक्तदान केले. त्याबरोबर महाविद्यालयातील २२० विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. युवती सभेचे उद्घाटन प्रा. संध्या सोनवणे यांच्याहस्ते झाले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. श्रीमती अनुपमा देवरे, प्रा. उषा शेलार, प्रा. पुष्पलता सोनवणे, प्रा. पे. ओ. फुलपगारे उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य अनंत पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. डॉ. पी. एस. साळुंके यांनी तर आभार प्रा. मधू पवार यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. शत्रुघ्न पाटोळे, प्रा. ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा. सचिन सोनवणे आदींनी सहकार्य केले.

पुण्य नगरी
रविवार, २० नोव्हेंबर २०१६ | धुळे

# अपघातात मृत विद्यार्थ्याच्या वारसास आर्थिक मदत





साक्री : येथील सि.गो.पाटील महाविद्यालयातील विद्यार्थी अश्पाक सुभान पिंजारी याचा अपघातात मृत्यू झाला होता. विद्यार्थ्याच्या वारसास महाविद्यालयातील विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजनेंतर्गत एक लाख ७० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यात न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीतर्फे एक लाख ६५ हजार रुपये तसेच विद्यापीठाच्या कुलगुरू वैद्यकीय निधीतून पाच हजार रुपये आर्थिक साहाय्य देण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांच्या हस्ते मृत विद्यार्थ्याचे वडील सुभान दादू पिंजारी व आई परवीन सुभान पिंजारी यांना रकमेचा धनादेश देण्यात आला. यावेळी अष्टाणे गावाचे सरपंच राजेश देवरे, भूषण शिंदे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. सुनील पालखे, कार्यालय अधीक्षक अनिल भामरे, अरुण पाटील, प्रा. आर. पी. देवरे, संतोष भावसार व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी अश्पाक पिंजारी यास श्रद्धांजली वाहण्यात आली. पिंजारी कुटुंबीयांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू, विद्यार्थी कल्याण अधिकारी, विद्या विकास मंडळाचे सभापती सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य, अष्टाणेचे सरपंच यांचे आभार मानले. आभार प्रा. सुनील पालखे यांनी मानले.

लोकमत धुळे, बुधवार, दि.१७ जानेवारी २०१८




विजेत्या स्पर्धकांसोबत ज्योती पाटील, जयश्री साळुंखे, ए.जे. तडवी, ए.आर. बोथीकर ,प्रा.अभय खैरनार, प्रा.प्रवीण सूर्यवंशी, प्रा.दीपक बाविस्कर.

# प्रसाद जगताप, तृप्ती शिंदे प्रथम

## स्वच्छतामित्र वक्तृत्व स्पर्धा : विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** जिल्हास्तरीय स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत कनिष्ठ गटातून साक्री येथील सि.गो.पाटील महाविद्यालयाची तृप्ती गुलाब शिंदे हिने, तर वरिष्ठ गटातून शहरातील जयहिंद महाविद्यालयाच्या प्रसाद देवीदास जगताप याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. हे दोन्ही स्पर्धक आता राज्यस्तरावर होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होतील.

शासनाच्या पाणी व स्वच्छता विभागातर्फे ही स्पर्धा येथील एसएसव्हीपीएस महाविद्यालयात मंगळवारी सकाळी घेण्यात आली. उद्घाटन प्राचार्य डॉ.मनोहर पाटील यांच्या हस्ते झाले. कनिष्ठ गटातील आठ, तर वरिष्ठ गटातील सात स्पर्धक सहभागी झाले.

दुपारच्या सत्रात बक्षीस वितरण कार्यक्रम झाला. पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ए.जे. तडवी अध्यक्ष होते.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या कनिष्ठ प्रशासन अधिकारी ज्योती पाटील, महाविद्यालयाचे प्रा.अनिल चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते.

परीक्षक म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयातील जयश्री साळुंखे, क्रीडा अधिकारी ए.आर. बोथीकर, एसएसव्हीपीएस महाविद्यालयाचे प्रा.अभय खैरनार, अभय बी.एड.कॉलेजचे प्रा.दीपक बाविस्कर, विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे प्रा.प्रवीण सूर्यवंशी यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा उर्वरित निकाल असा : कनिष्ठ गट -द्वितीय योगेश बिरारीस, न्यू इंग्लिश स्कूल साक्री, तृतीय साधना प्रकाश चव्हाण, डॉ.घोगरे कनिष्ठ महाविद्यालय शिरपूर, वरिष्ठ गट - द्वितीय नमिता सुनील पाटील, आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शिरपूर, तृतीय सतीश प्रकाश अहिरे, निर्मल कॉलेज धुळे. दोन्ही गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांच्या विजेत्यांना अनुक्रमे ११, ७ व ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

सूत्रसंचालन पाणी गुणवत्तातज्ज्ञ विजय हेलिंगराव यांनी, तर प्रास्ताविक संवाद सल्लागार अरुण महाजन यांनी केले.

यशस्वितेसाठी कक्षातील दीपक देसले, वैभव सयाजी, संगीता ओझा, जीवन शिंदे, त्रिलोक गुंडलेकर व महाविद्यालयाच्या वृत्तपत्र विद्या विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

---

आपला महाराष्ट्र
शुक्रवार १३ मार्च २०२०

# महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यशाळेचे आयोजन

साक्री, दि.१२ (प्रतिनिधी)- येथील सी.गो. पाटील [illegible]यालयातील चाणक्य स्पर्धा केंद्र व युनिक अकॅडमी पुणे, शाखा धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मुलींसाठी विशेष स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. प्रास्ताविक व उद्दिष्ट चाणक्य केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ.सचिन गोयनि यांनी केले. आपल्या उद्घाटकीय मनोगतात प्रा.डॉ.बच्छाव यांनी महिला व मुलींच्या जीवनातील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक स्तरावरील संघर्ष याविषयी मार्गदर्शन केले. डॉ बच्छाव यांनी विशद केले की, २० व्या शतकातील महिलांचा संघर्ष हा न्याय व हकासाठी होता, परंतु २१ व्या शतकात त्यांचे संघर्षाचे स्वरूप बदललेले आहे. कायद्याच्या चौकटीत महिलांना समानता आहे. परंतु सामाजिक व मानसिक स्तरावर महिलेकडे बघण्याचा दृष्टीकोन अद्याप बदललेला नाही. अशा कार्यशाळेतून तुमचा यशाचे मार्ग सुकर होतील व स्वतःला सिद्ध करू शकता. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी आजच्या महिला व मुलींच्या व्यक्तिमत्त्वातआव्हानात्मक भूमिका पार पाडण्याची क्षमता आहे, असे नमूद केले. अशा क्षमता व कौशल्यांचा कार्यशाळेच्या माध्यमातून विकास करून घ्यावा. कार्यशाळेचे साधन व्यक्ती प्राध्यापक राहुल पाटील यांनी स्पर्धा परीक्षा संदर्भातील विविध पैलू व वस्तुनिष्ठ स्वरूप समजावून दिले. सूत्रसंचलन कु.निवेदिता रामोळे हिने केले. कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थी पवन कर्डि याने आभार व्यक्त केले प्रा.नरेंद्र गवळी यांनी कार्यशाळेसाठी सहकार्य केले.



लोकमत
धुळे, मंगळवार, दि. २५ सप्टेंबर २०१८

# साक्री महाविद्यालयात स्वयंसिद्धा कार्यशाळा

## युवती सभेतर्फे आयोजन : कराटेचे प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

साक्री : पुरुषांपेक्षा स्त्रीयांची प्रतिभा जास्त असते पण आत्मविश्वास कमी असतो. त्यासाठी तरुणींमध्ये शारीरिक व मानसिक स्तरावर आत्मविश्वास निर्माण करुन त्यांना सशक्त बनविण्याची प्रक्रिया स्वयंसिद्धा कार्यशाळेतून केली जाते, असे प्रतिपादन कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा.हसिम शेख यांनी केले.

सी.गो. पाटील महाविद्यालय साक्री येथे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या युवती सभेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वयंसिद्धा कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून प्रा. शेख बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रशिक्षक मनोज रोहडे, शरद पवार, उपप्राचार्य प्रा.ए.बी. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.सुनिल पालखे व युवती सभा प्रमुख प्रा.ए.बी. देवरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.सुनिल पालखे यांनी केले. सूत्रसंचालन कल्याणी हिरे व आभार अंकीता बेडसे या विद्यार्थिनींनी केले.

लोकमत धुळे, मंगळवार, दि. २० फेब्रुवारी २०१८

# दोन सख्ख्या बहिणी विद्यापीठांच्या प्रतिनिधी

## कौतुक : गुणवत्तेच्या जोरावर मिळवले यश

लोकमत न्यूज नेटवर्क


रुबीना शहा


अंजुम शहा

साक्री : कोणतेही पद असो, त्यासाठी निवडणूक लढवावी लागते, पैसे खर्च करावे लागतात. मात्र उच्च शिक्षण विभागात गुणवत्तेच्या आधारावर वर्ग प्रतिनिधी, महाविद्यालय सचिव, विद्यापीठ प्रतिनिधी निवडण्याचा नियम हुशार विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या पथ्यावर पडत आहे. त्या आधारेच येथील रुबीना शहा व अंजुम शहा या दोन सख्ख्या बहिणी असलेल्या विद्यार्थिनींना झाला आहे. विशेष म्हणजे या दोघी दोन वेगवेगळ्या विद्यापीठांचे नेतृत्व करत आहेत.

तालुक्यातील शेवाळी येथील रहिवासी व येथील सी.गो. पाटील महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक खलील शहा फकीर यांच्या या दोन्ही मुली आहेत. यात रुबीना ही मोठी असून तिने नाशिक जिल्ह्यातील येवला येथील एसएनडीटी महाविद्यालयात बी.एड.साठी प्रवेश घेतला. तेथे बी.एससी. व एम.एससी.ला मिळविलेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी लावण्यात आली. त्यात रुबीनाला गुणवत्तेच्या जोरावर विद्यापीठ प्रतिनिधी होण्याचा मान मिळविला.

तर तिची लहान बहीण अंजुम खलील शहा फकीर ही येथील सी.गो. पाटील महाविद्यालयात तृतीय वर्ष विज्ञान वर्गात शिक्षण घेत आहे. तिनेही प्रथम व द्वितीय वर्ष विज्ञान या वर्गात चांगले गुण मिळवले असून राष्ट्रीय सेवा योजनेतील सक्रियता व संघटन कौशल्याच्या आधारे तिची विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

याबद्दल त्या दोघींचे विद्या विकास मंडळाचे सभापती सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजित पाटील, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ.डी.एल. तोरवणे, प्राचार्य डॉ.आर.आर अहिरे, उपप्राचार्य प्रा.अनिल पाटील, प्राध्यापक संघटना अध्यक्ष डॉ.संजय सोनवणे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व शेवाळी ग्रामस्थांनी कौतुक केले.